Vidya Vikas Mandal's
Sitaram Govind Patil Arts,
Science and Commerce College,
Sakri Tal. Sakri Dist. Dhule 424 304

विद्या विकास मंडळाचे,
सिताराम गोविंद पाटील कला,
विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
साक्री ता. साक्री जि. धुळे ४२४ ३०४

NAAC ACCREDITED

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

Website : www.sgpcsakri.com | Email : vidyavikas2006@rediffmail.com | Ph : 02568-242323

# Institutional Distinctiveness

## Academic Year (2021-22)







# Institutional Distinctiveness

## Academic Year (2021-22)




# Institutional Distinctiveness

## Academic Year (2021-22)



# Institutional Distinctiveness

## Academic Year (2021-22)






व ग्रामसेवकांना नोटिसा बजावल्या आहेत. त्यात म्हटले आहे, ग्रामसभेने ... जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतींवर राहील व अवैध उत्खनाबाबत ... कुसुंबा शिवारात २३ नोव्हेंबर २०२१ रोजी १०० ब्रास वाळूचा ... येईल, असेही या नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

# साक्रीतील पाटील महाविद्यालयात संविधानाचा जागर उपक्रम संपन्न

साक्री, दि.२६ (प्रतिनिधी) - राजकीय, सामाजिक, वैचारिक गुलामगिरीतून भारतीयांना स्वतंत्र करण्याचे कार्य भारतीय संविधानाच्या माध्यमातून झाले. संवैधानिक तत्त्व आणि मूल्यांचे अनुकरण करून प्रत्येकाने आपली जीवन अनुसरावे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी केले.

विद्या विकास मंडळाचे सी.गो. पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे भारतीय संविधान दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग आयोजित भारतीय संविधानाचा जागर उपक्रमात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून साक्री तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष विजय भोसले व प्रेस क्लबचे अध्यक्ष आबाजी सोनवणे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा.डी.पी. पाटील उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.अहिरे बोलताना पुढे म्हणाले की, संविधानाच्या प्रास्ताविकेचे ...क वाचन आणि पठांतर करून न थांबता त्यातील मूल्यांचे अवलंबन प्रत्येकाने आपल्या जीवनात केल्यास संविधान दिवस साजरा केल्याचे उद्दिष्ट प्राप्त होईल, असे मत व्यक्त केले. पत्रकारिता क्षेत्रातील कार्यामुळे विजय भोसले व आबाजी सोनवणे यांचा महाविद्यालयांनी भारतीय संविधानाची प्रत देऊन सत्कार केला. प्रसंगी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात येऊन विद्यार्थ्यांना प्रास्ताविकेच्या प्रती देण्यात आल्या. इयत्ता अकरावी विज्ञान च्या निशा रघुवीर परदेशी, पल्लवी नितीनकुमार तोरवणे, भावेश महेंद्र देसले, धीरज मच्छिंद्र ठाकरे या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या विविध विषयावर पोस्टर तयार करून त्यांचे सादरीकरण केले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त 'संविधान जागर' या उपक्रमांतर्गत सी गो पाटील महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक विद्यालय, आदर्श माध्यमिक विद्यालय इत्यादी ठिकाणी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेच्या २५० प्रतींचे वाटप करून संविधाना विषयी जनजागृती करण्यात आली. प्रसंगी मुख्याध्यापक पोपटराव ढोले, मुख्याध्यापक डी.एन. पाटील, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**Vidya Vikas Mandal's**
**Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College, Sakri Tal. Sakri Dist. Dhule 424 304**

**विद्या विकास मंडळाचे,**
**सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साक्री ता. साक्री जि. धुळे ४२४ ३०४**

NAAC ACCREDITED

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

Website : www.sgpcsakri.com | Email : vidyavikas2006@rediffmail.com | Ph : 02568-242323

# Institutional Distinctiveness

## Academic Year (2021-22)




पक्षाचे नगरसेवक व इतर पदाधिकारी उपस्थित होते.



साक्री : मराठी भाषासंवर्धन पंधरवडा ग्रंथ दिंडीत सहभागी प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे व प्राध्यापक.

### पाटील विद्यालयात भाषासंवर्धन पंधरवडा

**म्हसदी :** साक्री येथील विद्या विकास मंडळाच्या सी. गो. पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मराठी भाषा संवर्धन पंधरवडा व संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. दादासाहेब रामराव पाटील जयंती कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे अध्यक्षस्थानी होते. जी. टी. पाटील महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रा. डॉ. माधव कदम, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. डी. पी. पाटील, आईक्यूए सीचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, कार्यालयीन अधिक्षक नंदलाल अहिरे, क्रीडा संचालक डॉ. हसीनखा तडवी, ग्रंथपाल प्रा. सचिन वाघ उपस्थित होते. महाविद्यालयात ग्रंथदिंडीचे तसेच मराठी भाषेतील विविध अनमोल ग्रंथांचे प्रदर्शन केले. विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय प्रश्नमंजूषा घेतली. त्यात विविध महाविद्यालयातील १७२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. प्रश्नमंजुषेत पवन कारंडे प्रथम, दामिनी सोनवणे द्वितीय व निकिता चव्हाण या विद्यार्थिनीने तृतीय क्रमांक पटकविला. मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रकाश साळुंके यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. विश्वास भामरे यांनी आभार मानले.

Vidya Vikas Mandal's

# Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College, Sakri, Dist.- Dhule (MS).

# REPORT

# ON

# YUVATI SABHA

# 2021-22

Vidya Vikas Mandal's

# Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College, Sakri, Dist.- Dhule (MS).

# REPORT

# ON

# INAUGURATION OF YUVATI SABHA

# 29TH AUGUST 2021


Vidya Vikas Mandal's Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon, has a special independent **'Yuvati Sabha'** unit for the holistic development of Girl Students. Various programms have been organized throughout the academic year for the personality development of the Yuvati on behalf of the this unit.

## Objectives of Yuvati Sabha:


- To empower girl students in rural and tribal area.
- To enhance the overall personality of the girl students.
- To inculcate moral values among girls students

Vidya Vikas Mandal's S. G. Patil Art's, Science and Commerce College organizes girls personality development programme on the occasion of former MLA . Kai.Gojartai Bhamare's Smrutidin in every academic year. On this special day, the **Yuvati Sabha Unit** is inaugurated in the presence of chief guest. In this academic year 2021-22 the inaugural function of Yuvati Sabha's was held on 29th August 2021. Dr,Sanghmitra Nawalgund from Nilmala Niketan College of home Science Mumbai was the invited speaker of the programme. She delivered her talk on the topic "**Women Empowerment Inner Quist.** In her speech, she guided to girls students of the college. She said in her speech that empowering women is essential to health and social development of families, communities and countries. Without girls we can not imagine of the today's developed nation. Education is one of the most powerful weapon which need to be taken seriously. With the help of proper education, girls can change themeself and bring positive changes in their life. Dr. Patil gave importance of education in the girl's life. She added in her speech that role and responsibility of girls is very crucial for the development of society as well as nation. She interacted with girls students and answered to all questions raised by girls students in the programme. Total 88 students actively attended this online programme.

# Photographs of the Programme



Dr. Sanghmitra Nawalgund Madam while delivering inaugural speech



दिनांक 25 नोव्हेंबर 2021 रोजी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव निमित्य महाविद्यालयात राष्ट्रीय स्तराची नृत्य स्पर्धा घेण्यात आली. सदर स्पर्धेमध्ये सात जिल्ह्यातील विद्यार्थिनींनी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये प्रथम द्वितीय आणि तृतीय असे 5000 रुपयाचे पारितोषिक देण्यात आले. प्रथम पारितोषिक **कु. अश्विनी धुडका मुंबई,** द्वितीय पारितोषिक **कु.निर्भवा देवरकोंदा मुंबई**,तृतीय पारितोषिक **कू.आदिति बोबडे पुणे**, उत्तेजनार्थ पारितोषिक **कू.पायस सावळे जळगाव** यांनी मिळवले.


विद्या विकास मंडळ, साक्री (धुळे)
विद्या विकास मंडळाचे,
सी.गो. पाटील कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
साक्री जि.धुळे
राष्ट्रीय स्तरीय
ऑनलाइन नृत्य स्पर्धा विजेते स्पर्धक
WINNER
WINNER
प्रथम क्रमांक
अश्विनी दुडका,मुंबई
तृतीय क्रमांक
निर्भवा देवरकोंडा ,मुंबई
द्वितीय क्रमांक
आदिती बोबडे ,पुणे
उत्तेजनार्थ
पायस सावळे,जळगाव
सहभागी सर्व स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन !!!

# NEWS COVERAGE

## सी.गो.पाटील महाविद्यालयात नृत्य स्पर्धेचे पारितोषिक वितरण

साक्री । प्रतिनिधी

कला व संस्कृतीची जोपासना करतांना दातृत्वाच्या भावनेतून विद्यार्थ्यांनी आपली जीवनशैली निर्धारित करावी. असे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगावचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ पंकज कुमार नन्नवरे यांनी केले.

ते विद्या विकास मंडळाचे सी गो पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्रीच्या विद्यार्थी विकास विभाग, सांस्कृतिक विभाग व युवती सभेचे अंतर्गत महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी व स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित राष्ट्रीय नृत्य स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे होते. कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती माजी प्रा. एस सी बोरसे, रासेयो जिल्हा समन्वयक डॉ सचिन नांद्रे, उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ लहू पवार, आय क्यू एसी समन्वयक डॉ ज्ञानेश्वर चव्हाण,










सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ प्रकाश साळुंखे हे उपस्थित होते. परीक्षक प्रा स्वाती कांबळे, प्रा श्वेता पत्की प्रसंगी कार्यक्रमास उपस्थित होत्या. बक्षीस पात्र विद्यार्थ्यांसाठी कै नर्मदाबाई चतुर बोरसे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्री प्रा एस सी बोरसे यांच्यातर्फे पारितोषिक म्हणून रुपये ५००० देण्यात आले.

डॉ.पंकज कुमार नन्नवरे बोलताना पुढे म्हणाले की, करोना काळातून बाहेर पडत असताना अशा विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून सामाजिक जागृती होताना दिसून येते. प्रा एस सी बोरसे यांच्या दातृत्व भावनेचे कौतुक करताना डॉ नन्नवरे यांनी, समाजात आदर्श निर्माण करण्यासाठी असा प्रयत्न होणे व या दातृत्व भावनेचे अनुकरण इतरांनी करणे गरजेचे आहे असे प्रतिपादित केले. डॉ पंकजकुमार नन्नवरे यांनी या स्पर्धेचा निकाल जाहीर केला. त्यात प्रथम क्रमांकाचे २००० रुपयाचे पारितोषिक धूतका अश्विनी अविनाश व्ही ए कॉलेज वसई, द्वितीय क्रमांकाचे १५०० रुपयाचे पारितोषिक बोबडे आदिती दीपक एम आय टी अकॅडमी ऑफ इंजिनिअरिंग कॉलेज पुणे, तृतीय १००० रुपयाचे पारितोषिक देवरकोंडा निर्भय रघुराम निर्मला निकेतन कॉलेज ऑफ होम सायन्स मुंबई, उत्तेजनार्थ ५०० रुपयाचे पारितोषिक सावळे पियुष रविकिरण बेंडाळे महिला महाविद्यालय जळगाव यांनी पटकाविले.

आपल्या अध्यक्षीय समारोपात डॉ राजेंद्र अहिरे यांनी, महाविद्यालयाचा सुवर्णमहोत्सव व स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना विविधांगी कार्यक्रमांची आखणी महाविद्यालयातर्फे करण्यात आलेली असल्याचे नमूद केले. ज्यात महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक व विद्यार्थी यांचे योगदान बहुमुल्य व महत्वाचे असल्याचे देखील त्यांनी सांगितले. सदर स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध भागातील सोळा महाविद्यालयातून विस स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता. कार्यक्रमाचे संचलन डॉ चंद्रकांत कढरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ ज्योती वाकोडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आय क्यू ए सी समन्वयक डॉ ज्ञानेश्वर चव्हाण यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमास विविध महाविद्यालयातील स्पर्धक, विद्यार्थी व महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद तसेच शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

लक्ष महाराष्ट्र 28/11/2021

Vidya Vikas Mandal's

# Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College, Sakri, Dist.- Dhule (MS).

# REPORT

# ON

# INTERNATIONAL WOMEN DAY

# 8TH MARCH 2022

# INTERNATIONAL WOMEN DAY

Our Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce Ccollege celebrates International Women's Day every year to appreciate the role of women in society. In this academic year 2021-22, the invited lecture is organized on the occasion of International Women's Day. The president of the Vidya vikas Mandal's was the key note speaker of the programme She delivered his talk on **"Chala Atmnirbhar hou Ya ". She** said that it is the necessity of the time of women empowerment for the upliftment of women. Women plays very vital role in the nation building. They are the key agents for the all sector's development. We can not neglect the pivotal role played by the women in the society she added in his speech. The status of women of the 21 century is highlighted by the speaker in the programme . All Educated and Designated Women from sakri attended this programme with very passion. Students attended also the programme with great majority.

# Photographs of the Programme






# NEWS COVERAGE

लोकमत

साक्रीत महिलादिन कार्यक्रमात जि.प. सभापती मंगला पाटील यांचे प्रतिपादन

# महिलांनी स्वयंविकासासह आरोग्याकडे लक्ष द्यावे !

लोकमत न्यूज नेटवर्क

**साक्री** : सद्यस्थितीत महिला समाजातील अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या सक्षमपणे सांभाळत आहेत. मात्र, कौटुंबिक व सामाजिक जबाबदाऱ्या पूर्ण करीत असतांनाच महिलांनी स्वयंविकासाकडेसुद्धा अधिक लक्ष द्यावे, असे आवाहन धुळे जि.प.च्या आरोग्य व शिक्षण समिती सभापती मंगला सुरेश पाटील यांनी केले.

साक्री येथील सी.गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात, विद्या विकास मंडळ महिला गौरव समिती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी विद्याविकास मंडळ संस्थेच्या अध्यक्षा मंगला सुरेश पाटील होत्या.

प्रमुख अतिथी म्हणून साक्री नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा जयश्री पवार, त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ.मंगला देसले, डी.आर. पाटील बँकेच्या संचालिका मालती तोरवणे आदी उपस्थित होत्या.



साक्री येथील सी.गो. पाटील महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात बोलतांना जि.प. शिक्षण समिती सभापती मंगला पाटील. सोबत, नगराध्यक्षा जयश्री पवार, डॉ.मंगला देसले, मालती तोरवणे, रेखा सोनवणे आदी.

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील आदर्श महिलांचा सत्कार करण्यात आला. यात मनिषा पाटील, जयश्री भामरे व रंजना भदाणे यांना आदर्श माता म्हणून सन्मानित करण्यात आले. राजकीय क्षेत्रात कार्यरत साक्री नगरपंचायतीच्या नगरसेविका रेखा सोनवणे, संगीता भावसार, उषा पवार, जयश्री पगारिया, मनिषा देसले, संगीता भोसले यांचादेखील सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आदर्श कन्या-माता म्हणून डॉ.विद्या देवरे व तारा नांद्रे यांना गौरविण्यात आले. आदर्श सून म्हणून डॉ.प्रिया देवरे, आदर्श पत्नी व उद्योजक महिला म्हणून उज्वला सोनवणे, योगगुरू सारिका शिंदे, आदर्श शिक्षिका कविता देशमुख व आदर्श समाजसेविका म्हणून योगिता शाह यांचा सन्मान करण्यात आला.


ईशस्तवन व स्वागतगीताने कार्यक्रमांची सुरूवात झाली. कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाले. प्रास्ताविक वंदना जडे, सुत्रसंचालन अर्चना खैरनार तर आभार प्रदर्शन बबिता सोनवणे यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ.ज्योती वाकोडे, प्रा.भारती खैरनार तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमास साक्री शहरातील महिला व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

दिनांक 11 ते 18 मार्च 2022 रोजी महाविद्यालयीन विद्यार्थिनी साठी **ज्युडो कराटे प्रशिक्षणाचे** आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे क्रीडा विभागाचे संचालक डॉ. हसीनखा तडवी यांनी केले. या सात दिवसाच्या प्रशिक्षणामध्ये प्रशिक्षक **मनोज रोडे आणि शरद पवार** यांनी अतिशय उत्कृष्टपणे विद्यार्थिनींना ज्युडो कराटेचे प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षणाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर. आर. अहिरे उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.लहू पवार, माजी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.सुनील पालखे, महिला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.ज्योती वाकोडे उपस्थित होते. सदर प्रशिक्षणामध्ये 50 विद्यार्थिनींनी प्रशिक्षण घेतले.




Latitude: 20.995063
Longitude: 74.318134
Elevation: 435.25±20 m
Accuracy: 20.3 m
Time: 14-03-2022 15:53
Note: स्वयंसिद्धा प्रशिक्षण
Powered by NoteCam

दिनांक 27 एप्रिल 2022 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ऑनलाइन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. **'महिलांचे आरोग्य आणि योगा'** या विषयावरती व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सदर व्याख्यानास कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ योगा सेंटरच्या संचालिका **डॉ. लीना चौधरी** ह्या लाभल्या होत्या. त्यांनी विद्यार्थिनींना योगा आणि आरोग्य याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमात अध्यक्षस्थानी




# Participants Of the Programme

सकाळ धुळे, गुरुवार, २८ एप्रिल २०२२ २

# महिलांच्या मानसिक वेदनेवर योगाभ्यास उपयुक्त

## डॉ. चौधरी : साक्रीत एकदिवसीय राज्यस्तरीय ऑनलाइन चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

म्हसदी. ता. २७ : निसर्गाने महिलांना प्रदान केलेल्या प्रजनन संस्थेशी संबंधित मासिक प्रक्रियेतून होणाऱ्या वेदना या फक्त शारीरिक नसून मानसिक व भावनिकदेखील आहेत. या वेदनेवर मात करण्यासाठी योगाभ्यास व प्राणायामसारखे माध्यम उपयुक्त असल्याचे मत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगा प्रशिक्षण केंद्राच्या डॉ. लीना चौधरी यांनी व्यक्त केले. साक्री येथील विद्या विकास मंडळाच्या सी. गो. पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात 'योगाभ्यास आणि महिला आरोग्य' याविषयावर एकदिवसीय राज्यस्तरीय ऑनलाइन चर्चासत्र झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या.

ऑनलाइन चर्चासत्राचे कुलसचिव डॉ. किशोर पवार यांच्या हस्ते उद्घाटन झाले. राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सचिन नांद्रे, प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे आदी उपस्थित होते. योगाद्वारे एक सक्षम व समर्थ महिला होता येते. जंगासन, पश्चिमोत्तानासन, शवासन, अनुलोम विलोम, भ्रामरी, कंधरासन आदी आसनांबाबत डॉ. लीना चौधरी यांनी माहिती दिली. सहसमन्वयक डॉ. प्रीतम तोरवणे यांनी प्रास्ताविक केले. महिला कार्यक्रम अधिकारी डॉ ज्योती वाकोडे यांनी सूत्रसंचालन केले.प्रा. विश्वास भामरे यांनी आभार मानले.




डॉ. लीना चौधरी.

केले. संयोजन समितीतील उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, प्रा.सुनील पालखे, डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण,डॉ. हसीन खाँ तडवी, डॉ. प्रदीप राठोड यांनी परिश्रम घेतले.

### ऊर्जा वाढविण्यासाठी योग सहाय्य

सशक्त व चपळ, लवचिक शरीर तसेच शांत व संयमी मन या दोन्ही गोष्टी संपादित करायच्या असतील तर योगाभ्यास महत्त्वाचा आहे. ताणतणाव दूर करण्यासाठी, नातेसंबंधात सुधारणा करण्यासाठी, प्रेम, आनंद, उत्साह, स्फूर्ती व ऊर्जा वाढविण्यासाठी योग सहाय्यक म्हणून भूमिका बजावत असल्याचे डॉ. सचिन नांद्रे यांनी नमूद केले. प्राचार्य डॉ. अहिरे यांनी मन आणि भावनांवर विजय मिळवून जीवनातील सर्व दुःख दूर सारण्याचा सर्वोत्तम उपाय म्हणजे योग असल्याचे स्पष्ट केले. विजयराज जाधव या विद्यार्थ्याने बासरी वादन केले तर दिनेश नेरकर या विद्यार्थ्याने भजन सादर केले.

दिनांक 9 मे 2022 रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयात महारांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सदर स्पर्धेमध्ये  २० विद्यार्थिनींनी योगा या विषयावर अतिशय सुंदर अशा रांगोळ्या रेखाटल्या. स्पर्धेमध्ये प्रथम, द्वितीय,तृतीय असे पारितोषिके आंतरराष्ट्रीय योगा दिनाच्या दिवशी विद्यार्थिनींना देण्यात आले. सदर कार्यक्रमाची नोंद **मिनिस्ट्री ऑफ युथ अफेयर्स  अँड स्पोर्ट्स** यांच्या फेसबुक पेज वरती घेण्यात आली.


Latitude: 20.995069
Longitude: 74.318069
Elevation: 428.24±2 m
Accuracy: 13.9 m
Time: 09-05-2022 16:01
Note: रांगोळी स्पर्धा


3:44
facebook
Your Feed
Favorites
Recent
Ministry of Youth Affairs and Sports, Government of India
51m
As India moves closer to the #InternationalDayOfYoga2022, preparations are in full swing!
Look at these beautiful rangolis made under the Maha Rangoli Competition on Yoga organised by the NSS unit of C G Patil Mahavidyalaya Sakri Dist Dhule.
#IDY2022
NSS India, Fit India Movement, NSS Maharashtra

# मन आणि शरीर यांचा योग्य समन्वय योगाद्वारे साधला जातो : डॉ. सचिन नांद्रे



**साक्री (अनिल देसले दै. धुळे दवंडी)**: मन आणि शरीर यांचा योग्य समन्वय योगाद्वारे साधला जातो व त्याद्वारे व्यक्तिमत्व विकास होतो. असे विकसित व्यक्तिमत्व आपले पैलू वेगवेगळ्या स्पर्धेद्वारे व्यक्त होत असते. याचा अनुभव आजच्या या महारांगोळी स्पर्धेत आलेला दिसून येतो. यातूनच सुदृढ समाजाची मुहूर्त मेढ रोवली जाते असे प्रतिपादन डॉ सचिन नांद्रे यांनी व्यक्त केले. योग ही निरामय आरोग्याची गुरुकिल्ली आहे. त्यातील सातत्य आपणास अक्षय ऊर्जा प्रदान करते म्हणून निरामय आरोग्यासाठी योगसाधना महत्वाची आहे,असे मत आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ आर आर अहिरे यांनी मांडले.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिन जनजागृतीपर मोहिमेअंतर्गत रांगोळी स्पर्धेचे साक्री येथील सी गो पाटील महाविद्यालयात यशस्वी आयोजन करण्यात आले याप्रसंगी उदघाटक म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे रा से यो संचालक डॉ सचिन नांद्रे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आर आर अहिरे, उप प्राचार्य डॉ अनंत पाटील, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ ज्ञानेश्वर चव्हाण, करिअर कट्टा जिल्हा समन्वयक डॉ सचिन गोवर्धने, रा. से. यो.कार्यक्रम अधिकारी प्रा विश्वास भामरे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ ज्योती वाकोडे डॉ प्रकाश साळुंके, डॉ ए पी निकम आदी उपस्थित होते. एकूण १५ स्पर्धकांनी भाग घेतला होता या स्पर्धेत प्रथम क्रमांक - कु वैष्णवी अशोक पाटील द्वितीय क्रमांक -कु वैष्णवी दगडू जाधव तृतीय क्रमांक -कु पियुषा सुरेंद्रसिंग राजपूत उत्तेजनार्थ पारितोषिक- कु धनश्री भिला चौधरी, कु पूजा रवींद्र वाघ आणि कु गायत्री नंदकिशोर सैंदाणे यांनी पटकाविले. सदर स्पर्धेचे परीक्षण डॉ प्रकाश साळुंके आणि डॉ अनंत पाटील यांनी केले.